This question paper consists of 37 questions and 8 printed pages.
ह्या प्रश्नपत्रिकेत एकूण 37 प्रश्न आणि 8 छापील पाने आहेत.

Roll No. / अनुक्रमांक | | | | | | | | | | | | |

Code No. 60/S/A/M
कोड नं.

Set - **A**

# MARATHI

# मराठी

# (204)

**Day and Date of Examination**
**(परीक्षेचा दिवस आणि तारीख)** ____________________

**Signature of Invigilators** 1. ____________________

**(निरीक्षकाची सही)** 2. ____________________

**सामान्य अनुदेश :**

**1** परीक्षार्थीने प्रश्नपत्रिकेच्या प्रथम पृष्ठावर आपला अनुक्रमांक लिहावा.

**2** कृपा करून प्रश्न–पत्र तपासून घ्या की पुस्तकाचे एकंदर पृष्ठ आणि प्रश्नांची संख्या प्रथम पृष्ठावर सर्वात वर छापलेली आहे, तेवढीच आहे किंवा नाही. तसेच प्रश्नांची संख्यापण क्रमिक रूपात असावी.

**3** बहुपर्यायी प्रश्नांचे उत्तर देतांना तुम्हाला दिलेल्या पर्यायांतून योग्य तो पर्याय निवडावयाचा आहे. वेगळी देण्यांत येणाऱ्या उत्तर–पुस्तिकांमध्ये योग्य उत्तर लिहायचे आहे.

**4** बहुपर्यायी प्रश्नांचे सोबतच सर्व प्रश्नांची उत्तरे निर्धारित वेळेतच द्यावयाची आहेत. बहुपर्यायी प्रश्नांसाठी जास्त वेळ देण्यात येणार नाही.

**5** उत्तर–पत्रिकेत ओळख निदर्शनास आणणे आणि योग्य जागेच्या व्यतिरिक्त अनुक्रमांक लिहल्यास परीक्षार्थीला अयोग्य ठरविण्यांत येईल.

**6** आपल्या उत्तर–पत्रिकांवर प्रश्न–पत्रिकेचा कोड संख्या **60/S/A/M-A** लिहावेत.



UNNATI EDUCATIONS
9899436384, 9654279279

# MARATHI

## मराठी

## (204)

वेळ : 3 तास] [एकूण गुण : 100

**निर्देश :**

1 **सर्व** प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

2 **सर्व** प्रश्न काळजीपूर्वक वाचून मगच प्रश्नांचे उत्तरे लिहा.

3 प्रश्न **1** ते **11** पर्यंत प्रत्येकी चार पर्याय दिले आहेत. त्यातील योग्य पर्याय निवडून लिहा.

---

**1** लेखकाच्या एकलकोंडी आयुष्यात झेल्या त्याचा कोण झाला ? **1**

(अ) साथीदार (ब) सोबती

(क) मित्र (ड) सखा

**2** शास्त्र्यांनी संतांचे हाल केले, म्हणजे टिळकांच्या मते..... **1**

(अ) शास्त्र्यांनी मराठी भाषेचा पुरस्कार केला नाही.

(ब) शास्त्र्यांनी संतांना शारीरिक त्रास दिला.

(क) शास्त्र्यांनी इंग्रजी भाषेतून व्यवहार केला.

(ड) शास्त्र्यांनी संतांना नावे ठेवली.

**3** आचार्य विनोबाजींच्या मते मोठी माणसे कोणत्या घरात जन्माला येतात ? **1**

(अ) श्रीमंत (ब) सामान्य

(क) सुसंस्कृत (ड) गरीब

**4** कवी सागराला कोणाची शपथ घालत आहे ? **1**

(अ) भूमातेची (ब) गळयाची

(क) नदीची (ड) तद्विरहाची



UNNATI EDUCATIONS
9899436384, 9654279279

5 पाण्याने वेढलेल्या खडकावर ध्यानस्थ होऊन कोण बसले होते ? 1

(अ) विवेकानंद (ब) अगस्ती

(क) कन्याकुमारी (ड) लेखक

6 सकळ लोक एक करावे । गलीम ............ काढावे. 1

(अ) हुडकून (ब) उपटून

(क) उखडून (ड) निवटून

7 राजकीय क्रांतिकारकांच्या तुलनेने सामाजिक क्रांतिकारकांची संख्या कोणत्याही काळामध्ये नेहमी अत्यल्पच का असते ? 1

(अ) सामाजिक क्रांतिकारकांना प्रसिद्धी मिळत नाही.

(ब) सामाजिक क्रांतिकारकांना समाजाकडून भीषण यमयातना सहन कराव्या लागतात.

(क) क्रांतिकारकांना सामाजिक क्रांतीपेक्षा राजकीय क्रांती आवडते.

(ड) यापैकी कोणते ही नाही.

8 वीरपत्नी रणांगणावर जाणाऱ्या पतीला निरोप कसा देणार आहे ? 1

(अ) हासून (ब) सुखाने

(क) समाधानाने (ड) हुंदक्याने

9 योग्य वाक्प्रचार लिहून वाक्य पूर्ण करा. 1

नंदिनी ही गोपिकाबाईची सर्वात धाकटी सून पण लग्नानंतर थोड्याच दिवसात तिचाच जोर वाढला तेव्हा थोरली सून म्हणाली ............

(अ) तोंड दाबून बुक्क्यांचा मार

(ब) कामापुरता मामा

(क) कानामागून आली आणि तिखट झाली

(ड) मी हळद् अन् गोरी



UNNATI EDUCATIONS
9899436384, 9654279279

10 खालीलपैकी कोणता शब्द शुद्ध स्वरूपात आहे ? 1

(अ) आशिर्वाद (ब) आर्शीवाद

(क) आशीर्वाद (ड) अशीर्वाद

11 खालीलपैकी कोणत्या वाक्यात शब्दयोगी अव्यय वापरले आहे ते लिहा. 1

(अ) त्यानंतर ही घटना घडली.

(ब) मला दही आवडते.

(क) सर्वांना गोड फळे आवडतात.

(ड) मी आलो आणि पावसाला सुरूवात झाली.

12 खालील उतारा वाचून त्याखालील प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दांत लिहा.

**उतारा :**

जातीने मनुष्य श्रेष्ठ किंवा कनिष्ठ ठरतो हा विचार सर्व संतमहंतांनी आणि विचारवंतांनी पुसून टाकण्याचा अखंड प्रयत्न केला आहे. संतांचे विचार आणि आचार समतेचे द्योतक आहेत. ज्याच्या मनात समता नाही आणि ममताही नाही, त्याला संतत्त्वाच्या व देवत्त्वाच्या जवळ जाण्याचा अधिकार कधीच लाभणार नाही. ही विशाल व सर्वसमावेशक दृष्टी संतांच्या साहित्यातून प्रकट झाली आहे. 'भेदा–भेद भ्रम अमंगळ' आणि 'जे जे भेटे भूत ते ते जाणिजे भगवंत' हा उदात्त विचार तर्कशुद्ध आहे. आपल्या खांदयावर जातीचे, उच्चनीचतेचे जे पिशाच्च शतकानुशतके ठाण मांडून बसले आहे ते फेकून दिले पाहिजे. हे अनेक संतांनी गर्जून सांगितले आहे. पण माणसाने संतांच्या कपाळावर जाती – वर्णाची लेबले तत्परतेने आणि धूर्तपणे चिकटवली. खरे तर, साधूंचीच काय सर्वसामान्यांचीही जात माणूसच असते, माणूसच असावी. माणसाची जाती वाढावी, मानव्याची उंची वाढावी, हे संतांचे स्वप्न आहे. पण हे घडत नाही, म्हणून संतांच्या वाणीला अनेक वेळा हुंदके फुटलेले आहेत.

**प्रश्नः –**

(अ) संतांच्या वाणीला हुंदके का फुटले ? 2

(ब) संत साहित्यातील उदात्त विचार कोणता आहे ? 1

(क) संत महंतांनी कोणता प्रयत्न केला ? 1



UNNATI EDUCATIONS
9899436384, 9654279279

13 खालील काव्यांश लक्षपूर्वक वाचून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.

**काव्यांश**

संतकृपा झाली । इमारत फळा आली ॥ १ ॥

ज्ञानदेवे रचिला माया । उभारिले देवालया ॥ २ ॥

नामा तयाचा किंकर । तेणे रचिले ते आवार ॥ ३ ॥

जनार्दन एकनाथ । खांब दिधला भागवत ॥ ४ ॥

तुका झालासे कळस । भजन करा सावकाश ॥ ५ ॥

बहिणी म्हणे फडकती ध्वजा । निरूपणा केले वोजा ॥ ६ ॥

**प्रश्नः –**

(i) या अभंगाची रचना कोणी केली आहे ? 1

(ii) देवालयाचा पाया कोणी रचला आहे ? 1

(iii) आवार कोणी रचले आहे ? 1

(iv) या अभंगात कोणत्या संतांची नावे आली आहेत ? 1

14 राष्ट्र उभारणीसाठी कोणत्या राजाने डोंबारी जमातीचा उपयोग करुन घेतला ? 1

15 चोर आला तेव्हा नागू कसा झोपला होता ? 1

16 लेखक वि. स. खांडेकर यांचे अपरिग्रह व्रत कोणते ? 1

17 (अ) शास्त्रात आईचा गौरव कोणत्या शब्दांत केला आहे ? 2

(ब) शेतकऱ्याला झोप का येत नाही ? 2

18 (अ) भारतीय गणिततज्ज्ञांनी जगाला दिलेली देणगी कोणती ? 3

(ब) डॉ. हेगडेवार यांनी स्थापन केलेल्या संघटनेचे विशेष कोणते ? 3



UNNATI EDUCATIONS
9899436384, 9654279279

19 ''साहेब कोठे आहेत ?'' असे कोणी कोणास म्हटले आहे ? 1

20 (अ) भारताच्या भौगोलिक विविधतेशी संबंधित कोणते पौराणिक संदर्भ लेखकाच्या मनात आले ? 3

(ब) 'महर्षी कर्वे हे एक अद्भुत चमत्कार होते' असे प्र. के. अत्रे. का म्हणतात ? 3

21 श्रावणमासात फुलणाऱ्या फुलांचे वर्णन बालकवींनी कसे केले आहे ? 1

22 तळ्यातील बदके कशी होती ? 1

23 कवीने सागराला 'निर्दया' असे का म्हटले आहे ? 1

24 (अ) शेतात ढेकळांची पूजा का केली आहे ? 2

(ब) संभाजीराजे श्रेष्ठपुरूष पदवीस केव्हा पोहोचतील असे रामदास स्वामी म्हणतात ? 2

25 'पाऊलचिन्हे' या कवितेतून चांदण्या कवीला कोणता संदेश देतात ? 1

26 (अ) प्राणीसृष्टीतील कोणकोणती विलोभनीय दृश्ये बालकवी टिपतात ? 3

(ब) कोणता 'वर' मिळाल्यामुळे ज्ञानदेव सुखी झाले ? 3

27 (अ) कवीने कोणती आकांक्षा व्यक्त केली आहे व त्यासाठी कोणता त्याग करावयाची तयारी दाखविली ? 3

(ब) 'पहा पुसुनि टाकले डोळे' या कवितेत एकदाच जन्मात लाभते ही घटिका ! असे पत्नी शूरवीराला का म्हणते ? 3

28 पुढील म्हणींचा अर्थ लिहून स्वतःच्या वाक्यात म्हणीचा प्रयोग करा. (कोणतीही एक म्हण) 1

(i) ''इकडे आड तिकडे विहीर.''

(ii) ''नाचता येईना अंगण वाकडे.''



UNNATI EDUCATIONS
9899436384, 9654279279

29 पुढे दिलेल्या शब्दसमूहाला एक शब्द सुचवा. $\frac{1}{2}+\frac{1}{2}=1$

(i) आईवडील नसलेला.

(ii) कलानिर्मिती करणारा.

30 पुढील वाक्ये वाचून त्यातील क्रियापद ओळखा व क्रियापदाचा काळ कोणता आहे ते लिहा. $\frac{1}{2}+\frac{1}{2}=1$

(i) यंदा फार मोठी जत्रा भरली.

(ii) सचिनला वाईट वाटेल.

31 डॉक्टर व रुग्ण (पेशंट) यांच्यातील संवाद आठ ते दहा ओळींत लिहा. **4**

32 खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर **(200) दोनशे** शब्दांत निबंध लिहा. **10**

(i) आईची थोरवी

(ii) माझा आवडता नेता

(iii) आजचा शेतकरी

(iv) सूर्य उगवला नाही तर

33 या पाठ्यपुस्तकातील कोणता पाठ तुम्हाला सर्वात जास्त आवडला ? का आवडला ? त्या पाठाचे नाव व लेखकाचे नाव लिहा. **4**

34 खालील पैकी कोणत्याही **एका** विषयावर पत्र लिहा. **8**
(पत्रलेखनात पत्रलेखनाचे नियम कटाक्षाने पाळा.)

(i) कारगील लढाईत पराक्रम गाजवलेल्या सैनिकाला वीरचक्र मिळाल्याबद्दल त्याचे अभिनंदन करणारे पत्र लिहा.

(ii) परगावी शिक्षणासाठी राहिलेल्या आपल्या लहान भावाने कसे वागावे याबद्दल मार्गदर्शन करणारे पत्र लिहा.

(iii) तुमच्या परिसरात घाणीचे साम्राज्य पसरले आहे. त्या दुर्गंधीचा तुम्हाला त्रास होत आहे. त्याबद्दल तक्रार करणारे पत्र ग्रामपंचायत / नगरपालिका यांना लिहा.



UNNATI EDUCATIONS
9899436384, 9654279279

35 (अ) खाली दिलेल्या शब्दांचे दोन–दोन समानार्थक शब्द लिहा. 2

(i) भरपूर (ii) नमस्कार

(ब) पुढील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा. 2

(i) आदर (ii) आशा

(iii) उष्ण (iv) आरंभ

36 पुढील उतारा लक्षपूर्वक वाचा व स्वतःच्या भाषेत त्याचे **एक तृतियांश** सारांश लेखन करा; त्याला योग्य शीर्षक द्या. 4

मातृभाषा म्हणजे आपली आई ज्या भाषेत बोलते ती भाषा. माझी मातृभाषा मराठी आहे. प्रत्येक मूल पहिल्यांदा आपल्या आईच्याच भाषेत बोलायला शिकते. कारण आईचीच भाषा त्याला कळते. आई अशिक्षित असली तरी तिची एक भाषा असते. हीच भाषा ती आपल्या मुलांना शिकविते. कोणत्याही प्रकाराचे ज्ञान हे मातृभाषेतून लवकर व सहज होते. त्यामुळे मातृभाषेतून आपल्या मनातील भावना किंवा कल्पना जितक्या प्रभावीपणे व्यक्त करतात तितक्या प्रभावीपणे इतर भाषेतून व्यक्त करता येत नाहीत. मराठी ही माझी मायबोली असून आमच्या महाराष्ट्र राज्याची ती राज्यभाषा आहे, प्रशासनाची भाषा आहे. माझी मातृभाषा एक श्रेष्ठ आणि समृद्ध अशी भाषा आहे. ज्ञानदेव, तुकारामादि सर्व संतांनी माय मराठी भाषेतून ओव्या, अभंग लिहून सर्व लोकांना उपदेश केला. विठ्ठलभक्ती शिकविली.

37 खालील माहितीच्या आधारे प्रवाह–चार्ट बनवा – 4

आजारी, डॉक्टरांकडे जाणे, तपासणे, औषध घेणे, बरे होणे.

---



UNNATI EDUCATIONS
9899436384, 9654279279